सर्वसा. ७
Gen. 73

मकामुना (एच-२०२)—५-२. १०—२,००,०००—पीएs*
शा. ज्ञा., सा. प्र. वि., क्र. पीएफआर १०७३/सीआर-६४/७९१३-अ, दि. २८-५-१९८१;
दि. ८-१-८७ चे सा. प्र. वि., पत्र क्र. भ. नि. नि.-११८५/प्र-४८/तेरा-अ.]

(हा नमुना भरण्यापूर्वी मागील पृष्ठावर छापलेल्या सूचना कृपया काळजीपूर्वक वाचाव्यात)

## नामनिर्देशनाचा नमुना [ नियम ७ (३) पहा ]

भविष्यनिर्वाह निधी लेखा क्र. † ..................................................

* कुटुंब असलेल्या/* कुटुंब नसलेल्या वर्गणीदारांच्या वापरासाठी

* (१) मी, ‡ ........................................................................................ , याद्वारे, माझी भविष्यनिर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यू झाल्यास, निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असेल अशी रक्कम घेण्यास, मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी, नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, माझ्या कुटुंबातील व्यक्ती * असलेली * असलेल्या खाली निर्दिष्ट * केलेली/* केलेल्या * व्यक्तीला/* व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम * उक्त व्यक्तीच्या/* उक्त व्यक्तींच्या * नावासमोर/* नावांसमोर दिलेल्या पद्धतीने * त्या व्यक्तीला/* त्या व्यक्तींमध्ये * देण्यात यावी./* वाटून देण्यात यावी.

* (२) मी, ‡ ........................................................................................ , मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी, नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कुटुंब करीत नसल्याकारणाने, माझी भविष्यनिर्वाह निधीमधील रक्कम मला देय होण्यापूर्वी अथवा ती देय झालेली असून देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यु झाल्यास निधीमध्ये माझ्या खात्यावर जमा झालेली असेल अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या * व्यक्तीस/* व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निदेश देत आहे की, उक्त रक्कम * उक्त व्यक्तीच्या नावासमोर/* उक्त व्यक्तींच्या नावांसमोर दिलेल्या पद्धतीने * त्या व्यक्तीला देण्यात यावी./त्या व्यक्तींमध्ये वाटून देण्यात यावी.

यानंतर मी कुटुंब प्राप्त केल्यास हे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल.

| नामनिर्देशित * व्यक्तीचे/* व्यक्तींची नाव/नावे व पूर्ण पत्ता | वर्गणीदाराशी असलेले नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | (प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला) देय असलेला भाग | आकस्मिक घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधिअग्राह्य ठरेल अशा आकस्मिक घटना | नामनिर्देशित व्यक्ती मरण पावल्यास त्याचा/तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे/व्यक्तींकडे जाणार असेल त्या * व्यक्तीचे/* व्यक्तींची नाव/नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

दिनांक .................................. ठिकाण ..................................

स्वाक्षरीचे दोन साक्षीदार

| | नाव | पत्ता |
|---|---|---|
| (१) | .................. | .................. |
| (२) | .................. | .................. |

वर्गणीदाराची स्वाक्षरी

[मा

## *कार्यालय प्रमुखाच्या/* महालेखाकाराच्या कार्यालयातील वापरासाठी

श्री./श्रीमती/कुमारी .................................................................. यांनी केलेले नामनिर्देशनपत्र.

पदनाम ..................................................................

नामनिर्देशनपत्र मिळाल्याचा दिनांक ..................................................................

स्वाक्षरी ..................................................................

(कार्यालय प्रमुखाचे पदनाम) ..................................................................

दिनांक ..................................................................

स्वाक्षरी ..................................................................

लेखा अधिकारी
महालेखाकार यांचे कार्यालय

दिनांक ..................................................................

---

**सूचना :–** * लागू नसलेला असा अथवा अनावश्यक असलेला मजकूर खोडावा.

† येथे वर्गणीदाराने स्वतःचा भविष्यनिर्वाह निधी लेखा क्रमांक लिहावा.

‡ येथे वर्गणीदाराने स्वतःचे नाव लिहावे.

(१) मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमातील "कुटुंब" या शब्दाची व्याख्या खाली पुनरुद्धृत केली आहे.—

"कुटुंब" याचा अर्थ—

(एक) पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराची बायको किंवा बायका आणि त्याची मुले, आणि वर्गणीदाराच्या मयत मुलाची विधवा बायको किंवा बायका आणि त्याची मुले :

परंतु, जर वर्गणीदाराने त्याची पत्नी न्यायिकरीत्या त्याच्यापासून विभक्त झाली आहे किंवा ती ज्या जातीची आहे त्या जातीच्या रुढीगत विधीनुसार तिने निर्वाहाचा हक्क गमावलेला असेल असे सिद्ध करून दाखविले तर, हे नियम ज्या बाबतीत लागू होतात त्या बाबतीत ती वर्गणीदाराच्या कुटुंबाची सदस्य मानली जाणार नाही. तथापि, जर वर्गणीदार नंतर स्पष्ट लेखी निवेदनाद्वारे अशी व्यक्ती कुटुंबातील सदस्य समजण्यात यावी, असे लेखा अधिकाऱ्यास कळवील तर ती व्यक्ती वर्गणीदाराच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

(दोन) स्त्री वर्गणीदाराच्या बाबतीत, वर्गणीदाराचा पती आणि तिची मुले आणि वर्गणीदाराच्या मृत मुलाची विधवा बायको किंवा बायका आणि मुले;

परंतु, जर एखाद्या वर्गणीदाराने, लेखा अधिकाऱ्याला लेखी निवेदनाद्वारे तिच्या पतीला कुटुंबातून वगळण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली असेल त्याबाबतीत, वर्गणीदाराने त्याला तिच्या कुटुंबातून वगळण्यासंबंधीचे लेखी निवेदन त्यानंतर रद्द केलेले नसेल तर, हे नियम ज्या बाबींच्या संबंधात लागू असतील, त्या बाबीपुरते त्यास त्यापुढे कुटुंबाचा सदस्य समजण्यात येणार नाही. परंतु, जर वर्गणीदार नंतर अशा व्यक्तीस कुटुंबातून वगळण्याबाबत दिलेली सूचना लेखीरित्या रितसरपणे रद्द करील तर अशा व्यक्तीस कुटुंबातील व्यक्ती म्हणून समजण्यात येईल.

**टीप १ –** "मुले" याचा अर्थ औरस संतती असा आहे.

**टीप २ –** वर्गणीदारास लागू असलेल्या व्यक्तीगत कायद्यानुसार जर मूल दत्तक घेणे कायदेशीररित्या मान्य करण्यात आले असेल व त्यामुळे मुलाचा नैसर्गिक मुलाचा दर्जा प्राप्त होत आहे याबाबत लेखा अधिकाऱ्यास किंवा लेखा अधिकाऱ्याच्या मनात कोणताही संदेह निर्माण झाल्यास, मुंबई शासनाचे सॉलिसिटर यांचे समाधान होईल तर, दत्तक घेतलेले मूल नैसर्गिक मूल म्हणून समजण्यात येईल. परंतु ही गोष्ट केवळ यांबाबतीतच मान्य करण्यात येईल.

(२) केवळ एकाच व्यक्तीला नामनिर्देशित करण्यात आले असेल तर, नामनिर्देशिताच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये "पूर्ण रक्कम" असे लिहण्यात यावे. एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर, भविष्यनिर्वाह निधीच्या संपूर्ण रकमेतील किती हिस्सा नामनिर्देशितीला देय आहे ते प्रत्येक नामनिर्देशितीच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात यावे.

(३) नामनिर्देशितीचा (नामनिर्देशितींचा) मृत्यू ही घटना आकस्मिक घटना म्हणून स्तंभ ५ मध्ये नमूद करू नये.

(४) वर्गणीदाराने स्वतःचे नाव स्तंभ ६ मध्ये नमूद करू नये.

(५) वर्गणीदाराने नामनिर्देशनावर स्वाक्षरी केल्यानंतर त्यामध्ये आणखी कोणतीही नावे समाविष्ट करता येऊ नयेत म्हणून शेवटच्या नोंदीनंतरच्या रिकाम्या जागेत तिरप्या रेषा काढाव्यात.